आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

११ सप्टेंबर २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची मॉरिशसच्या प्रधानमंत्र्यांशी द्विपक्षीय चर्चा/ उभय देशांमधे ४ महत्त्वाचे करार

- नवनिर्वाचित उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांचा राज्यपाल पदाचा राजीनामा, तात्पुरता कार्यभार आचार्य देवव्रत यांच्याकडे

- उद्योग आणि गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे देशातलं सर्वोत्तम राज्य असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना निधी वितरणाला आजपासून प्रारंभ

**आणि**

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताची विजयी सलामी

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मॉरीशसचे प्रधानमंत्री नवीनचंद्र रामगुलाम यांच्यात आज वाराणसी इथं द्विपक्षीय चर्चा झाली. यावेळी भारत आणि मॉरीशस यांच्यात चार सामंजस्य करार झाले. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सहकार्याचा करार, राष्ट्रीय सागरीविज्ञान संस्था आणि वैज्ञानिक औद्योगिक संशोधन परिषदेचा मॉरिशसच्या सागरीविज्ञान संस्थेबरोबरचा करार, प्रशासकीय सुधारणासाठी उभय देशातल्या कार्मिक आणि निवृत्तीवेतन विभागांमधला करार, तसंच दूरसंवाद, आणि अंतराळविज्ञान क्षेत्रात सहकार्यासाठीचा करार यांचा त्यात समावेश आहे. याखेरीज उर्जा, मॉरिशसमधल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना अर्थसहाय्य, आणि जलसंसाधन क्षेत्रात सहकार्य या विषयीच्या आणखी ३ समझोत्यांवर आज स्वाक्षऱ्या झाल्या.

**<><><><>**

सी. पी. राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्यामुळे त्यांनी आज महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा राजीनामा दिला. गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत

यांच्याकडे महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सोपवला आहे.

**<><><>**

मुंबईत गेट वे ऑफ इंडिया इथून सुरू होणाऱ्या भारतीय सैन्याच्या IASV त्रिवेणी या बोटीच्या पहिल्या परिक्रमेला आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दूरस्थ पद्धतीनं हिरवा झेंडा दाखवला. यावेळी संरक्षण दलप्रमुख जनरल अनिल चौहान, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, ॲडमिरल दिनेश त्रिपाठी आणि एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह हे देखील दूरस्थ पद्धतीने सहभागी झाले होते. या मोहिमेत भारतीय भूदल, नौदल आणि हवाई दलातल्या १० महिला अधिकाऱ्यांचा समावेश आहे. लेफ्टनंट कर्नल अनुजा वरुडकर या पथकाचं नेतृत्व करत आहेत. या प्रवासाविषयी त्यांनी अधिक माहिती दिली..

**होल्ड.. बाईट - अनुजा वरुडकर**

आयएएसव्ही त्रिवेणी ही बोट आजपासून समुद्र प्रदक्षिणेसाठी रवाना झाली असून या प्रवासाला नऊ महिने लागतील. या दरम्यान ही बोट २६ हजारांपेक्षा जास्त नॉटिकल मैलांचा प्रवास करणार आहे. प्रवासात ही बोट चार परदेशी बंदरांवर थांबणार आहे. या बंदरांवर या महिला अधिकारी भारतीय समुदायाशी संवाद साधतील. सागरी प्रदक्षिणा पूर्ण झाल्यानंतर ही बोट पुढच्या वर्षी मे महिन्यात पुन्हा भारतात परतणार आहे.

**<><><>**

महाराष्ट्रातले सुमारे दीडशे पर्यटक नेपाळमधे अडकले असून त्यांना परत आणण्यासाठी राज्य सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून प्रयत्न सुरू असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. शिंदे यांनी या पर्यटकांशी दूरध्वनीवरून संवाद साधला आणि त्यांना परत आणण्यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी मदत करेल अशी ग्वाही त्यांनी दिली.

राज्य सरकार भारतीय दूतावासाशी बोलून नेपाळमध्ये अडकलेल्या पर्यटकांशी सतत संपर्कात आहे, असं राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण यांनी वार्ताहरांना सांगितलं. उद्यापर्यंत नेपाळ-भारत विमान सेवा पूर्ववत होण्याची शक्यता आहे, त्यानंतर पर्यटकांना परत आणायला सुरुवात होईल.

**<><><>**

नेपाळमधे अराजकाच्या पार्श्वभूमीवर हंगामी सरकारच्या स्थापनेसाठी राष्ट्रपती रामचंद्र पौडेल, लष्करप्रमुख अशोकराज सिगडल आणि तरुणांचे प्रतिनिधी यांच्यात चर्चा सुरू आहे. हंगामी सरकारचं नेतृत्व करण्यासाठी युवा प्रतिनिधींनी सर्वोच्च न्यायालयाच्या माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सुशीला कार्की यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

**दरम्यान**, माजी प्रधानमंत्री पुष्पकमल दहल प्रचंड यांनी युवा आंदोलकांना पाठिंबा दर्शवला असून हिंसाचाराची स्वतंत्र चौकशी व्हावी असं म्हटलं आहे. तसंच आंदोलकांना शांततेचं आवाहन केलं आहे.

**<><><><>**

नेपाळ मधल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर बिहार, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमधे भारत-नेपाळ सीमेवर सुरक्षा वाढवण्यात आली आहे. पोलीस आणि सशस्त्र सीमा दलही सीमापार हालचालींवर बारकाईनं लक्ष ठेवून आहेत.

**<><><><>**

जुनी वाहनं भंगारात काढण्याचं धोरण देशाची अर्थव्यवस्था आणि पर्यावरण या दोन्हीसाठी वरदान ठरलं आहे, असं मत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केलं. ते आज नवी दिल्लीत भारतीय वाहन निर्माते महासंघाच्या ६५व्या वार्षिक संमेलनात बोलत होते. ऑगस्ट २०२५ पर्यंत ३ लाख वाहनं भंगारात काढण्यात आली, यात १ लाख ४१ हजार सरकारी वाहनांचा समावेश होता, अशी माहिती त्यांनी दिली. ज्यांनी आपली जुनी वाहनं भंगारात काढली आहेत अशा लोकांना नव्या वाहनांच्या खरेदीवेळी जीएसटीमध्ये सवलत मिळावी अशी विनंती आपण प्रधानमंत्र्यांना केली असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

उद्योग आणि गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे देशातलं सर्वोत्तम राज्य असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत जियो वर्ल्ड ट्रेड सेंटर इथं इंडिया-ऑस्ट्रेलिया मंचाच्या गोलमेज परिषदेत बोलत होते. गुंतवणूकदार आणि उद्योजकांच्या राज्य शासनाकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सरकार नेहमीच तत्पर असून, विविध क्षेत्रांविषयी नवीन आणि परिपूर्ण धोरण आखत आहे. येत्या काळात

१४ क्षेत्रांसाठीची धोरणं जाहीर होणार आहेत. त्यामध्ये सेवा क्षेत्राची समावेश आहे. व्यापार सुलभतेत नव्यानं सुधारणा केल्या जात आहेत. गुंतवणुकीच्या नवीन संकल्पना राबवल्या जात आहेत, असं त्यांनी सांगितलं.

**<><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा ऑगस्ट महिन्याचा सन्मान निधी आजपासून लाभार्थ्यांच्या खात्यात जमा व्हायला सुरुवात होईल. महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी ही माहिती दिली.

**<><><>**

नव्या पिढीच्या जीएसटी सुधारणांच्या अंतर्गत, केंद्र सरकारनं अनेक वस्तूंवरच्या करात बदल केला आहे. व्यापारी वर्गाकडूनही या बदलांचं स्वागत होतआहे.

ऐकूया एका इलोक्ट्रॉनिक उपकरण विक्रेत्याची प्रातिनिधिक प्रतिक्रीया..

**- होल्ड - बाईट- राजपुरोहित - -**

**<><><>**

दुबई इथं सुरू असलेल्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत, अ गटात भारतानं काल संयुक्त अरब अमिरातीच्या संघावर ९ गडी राखून विजय मिळवला. युएईच्या संघानं ५८ धावाचं लक्ष्य भारतापुढे ठेवलं होतं, ते केवळ ४ षटकं आणि तीन चेंडूत पूर्ण करताना केवळ एक गडी गमावला. अभिषेक वर्मानं १६ चेंडूत ३० धावा केल्या तर त्याला शुभमन गिलनं २० धावा करत साथ दिली. तत्पुर्वी भारतानं युएईला १३ षटकं १ चेंडूत ५७ धावांवर बाद केले.

आजचा सामना बांगलादेश आणि हाँगकाँग या संघांमध्ये अबुधाबी इथं होणार आहे.

**<><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेतला भारत-पाकिस्तान सामना रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर तातडीनं सुनावणी घ्यायला आज सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. येत्या १४ सप्टेंबर रोजी हा सामना होणार आहे. पहलगाम इथला दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तान विरुद्ध खेळल्याने राष्ट्रीय प्रतिष्ठेला धक्का बसेल, त्यामुळे हा सामना रद्द करावा अशी याचिका कायद्याचं शिक्षण घेणाऱ्या चार विद्यार्थ्यांनी केली होती.

त्यावर तातडीने सुनावणी घ्यायला आज न्यायमूर्ती जे. के. महेश्वरी आणि विजय बिश्नोई यांच्या पीठाने नकार दिला.

<><><><>

अन्न आणि औषध प्रशासनानं आज नागपूरमध्ये ४ हजार लिटरहून अधिक बनावट दह्याचा साठा जप्त केला. गुप्त माहितीच्या आधारे केलेल्या या कारवाईत मध्य प्रदेशातल्या जबलपूर इथून आलेले दह्याची २७० पिंपं जप्त करून नष्ट करण्यात आली. योग्य मानकांचं पालन न करता तयार केलेल्या या दह्याच्या सेवनामुळे ग्राहकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो, हे लक्षात घेऊन प्रशासनानं ही कारवाई केली. जप्त केलेल्या  दह्याचे नमुने चाचणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले आहेत आणि या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे.

<><><><>

अकोला इथं २०२३ मधे झालेल्या दंगलीचा तपास करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. न्यायाधीश न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या अध्यतेखालील पिठानं हा आदेश दिला.  या दंगलीत जखमी झालेल्या व्यक्तीनं विशेष तपास पथक स्थापन करण्याची मागणी करणारी याचिका उच्च न्यायालयानं फेटाळली होती. या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं होतं. मे २०२३ मधे समाजमाध्यमावरील एका वादग्रस्त पोस्टवरून अकोल्यात दंगल भडकली होती.

<><><><>

नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी केलेल्या प्रभाग रचनेवरच्या हरकतींवर आज वाशी इथे सुनावणी होत आहे. हरकतदारांना प्रभागानुसार वेळ निश्चित करून दिली असून निर्धारित वेळेत न पोहोचणाऱ्यांच्या हरकती एकतर्फी निकाली काढल्या जाणार आहेत.

//<><><><>//